# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 14/10/2020 (बुधवार)
(सकाळ)

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 20 किमी अंतरावर कन्हान नदी घाट सोनेगाव कामठी येथे दिनांक 13/10/2020 चे 07.20 वा. दरम्यान फिर्यादी नामे – पो.शि. निशांत मेश्राम हे स्टाफसह बीट परीसरात पेट्रोलिंग करीत असतांना कन्हान नदीघाटातुन एमच–49/डी–3930 क्रमांकाचा पिकअप गाडीचा चालक आरोपी क्र– 1) मीथुन चरणदास देवगडे, वय 29 वर्ष, रा. सोनेगाव राजा व 2) कंठीराम मेश्राम, रा सोनेगाव राजा यांनी संगनमत करून त्यांच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 80 फुट रेती किं. 2,000/– रू. चोरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण 4,02,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस शिपाई निशांत मेश्राम यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा प्रशांत काळे हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 09 किमी अंतरावर बोरगाव ते चिचोली रोड येथे दिनांक 12/10/2020 चे 07.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– संजय भगवान पडवाळ, वय 30 वर्ष हे तहसील कार्यालय मौदा येथे तलाठी या पदावर कार्यरत असुन ते स्टॉपसह अवैधरेती वाहतुकीबाबत कार्यवाही कामी पेट्रोलिंग करीत असता एमएच–36/एए–2022 क्रमांकाचा ट्रकला थांबवुन तपासणी केली असता आरापी नामे क्र. 1) मुकेश संतोष मते, वय 30 वर्ष, न्याहारवानी व ट्रक मालक आरोपी नामे क्र. 2) अतुल ठोबळे, वय 30 वर्ष, मोहगाव देवी भंडारा यांनी संगणमत करून सदर ट्रक मध्ये एकुण 5 ब्रास किंमती 49,500/– रु चोरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण 12,89,500/– चा मुद्देमाल ताब्यात घेवुन सदर जप्ती पंचनामा तयार करुन ट्रक चालक यास सदर ट्रक व अवैद्य रेती ही पोस्टे मौदा येथे घेवुन जाण्यास सांगीतले असता आरोपी ट्रक चालकाने आपले वाहन व अवैद्य रेती ही भंडाराचे दिशेने घेवुन पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ ठाकुर पो.स्टे मौदा मो क्र 7083151993 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील हायवे रोड वडोदा कामठी येथे दिनांक 13/10/2020 चे 04:00 वा. ते 06.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– धनराज आसाराम दवारबंसी, वय 35 वर्ष, रा. कीरणापुर, जि. बालाघाट मध्यप्रदेश यांचे बकरी खरेदी वीक्री चा व्यवसाय आहे. फिर्यादी हे त्यांची एमएच–35/एजे–1093 क्रमांकाच्या पीकअप गाडीमध्ये 95 बकऱ्या भरुन आमगाव वरुन नागपुर कडे जात होते. आरोपी नामे– महेश भोयर याने त्याच्या ताब्यातील एमएच–35/एजे–1093 क्रमांकाची पीकअप गाडी भरगाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने त्याचे पीकअप गाडीचा मागील डाव्या बाजुचा टायर फाटल्याने गाडीचे संतुलन बिघडुन गाडी उलटली. या अपघातात गाडीमध्ये बसलेला अशोक नागवंशी, वय 35 वर्ष, रा. कीरणापुर, जि. बालाघाट मध्यप्रदेश हा जागेवर मरण पावला व तीन लोक 1) बबलु 2) क्रिष्णा 3) विनोद यांना कीरकोळ व गंभीर स्वरुपाचा मार लागला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा जगवाड 8329948101 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर